
# समुद्रकविता



गुरुनाथ धुरी

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३५२

REFBK-0022359
REFBK-0022359

ज्ञानविज्ञान प्रकाशन

गुरुनाथ धुरी

# समुद्रकविता

REFBK-0022359
REFBK-0022359

१९७७

© १९७७, गुरुनाथ धुरी

मुद्रक–प्रकाशक : सुशीला पानसे, ज्ञानविज्ञान प्रकाशन, सोनोरी, ३६ चरई, ठाणे ४०० ६०१. * मुद्रणस्थळ : सुपरप्रिन्ट, ३९ खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१. * प्रकाशन दिनांक : १ जून १९७७.

मुखपृष्ठ : अरुण काळे

किंमत : चार रुपये

कै.

आईच्या

स्मृतींस ...

माझ्या कवितेसंबंधी काही विचार सात
समुद्र १
मातीभरली कुंडी ३
विलक्षण शांततेची बोट ४
झाडांनो ५
एका आयुष्यांचा अर्थ ६
काळोखांतून काळोखांत सरकणारीं आयुष्यं ७
झगा ८
फुलांचा गुच्छ ९
A Language of Flesh and Roses : १ १०
A Language of Flesh and Roses : २ ११
ऑपरेटर १२
कविता १३
बर्फाच्या एका शहराचं छायाचित्र १४
पाखरांच्या गाण्याप्रमाणे १५
सर्वांच्या-सर्व चेहऱ्यांच्या आठवणी १६
राजा १७
कॅफे आयडियल १८
तुडुंब हिरवेपण रानाचें १९
गोष्ट कवीची आणि कविप्रियेची// परीकथेंतल्या किशोरीने २०
फुलाफुलांची चादर २१
तीन कविता : तिच्या २२
बाक : सार्वजनिक बागेतलं २३
वसंत आबाजी डहाकेसाठी// न पूर्ण उमललेलीं फुलं हीं २४
लकेर २५
इशाऱ्याच्या रात्रीं २६
झणत्कार २७
घुबडतोंड मरण आलंय सजून २८
तो येतोय तो येणारच २९
एका अज्ञात शहराच्या अंतिम धूम्रज्वाला ३०
आज कित्येक कल्पांनंतर ३१

## माझ्या कवितेसंबंधी काही विचार

भूमिका निश्चित करून लिहिणे मला कधीच पटले नाही. अशा प्रकारे लिहिणे म्हणजे एखाद्या सामाजिक, राजकीय, वाङमयीन, आध्यात्मिक वा तत्सम तत्त्वाशी बांधिलकी स्वीकारून लिहिणे. चिंतनशील व्यक्तित्वापेक्षा जीवनाच्या अनेकविध रूपांकडे बालसदृश कुतुहलाने पाहणारे व्यक्तित्व मला कलानिर्मितीच्या दृष्टीने मोलाचे वाटत आले आहे. जसा कोणत्याही तात्त्विक भूमिकेला मी शरण गेलो नाही तसाच स्वत:ची अशी विशिष्ट प्रतिमा मनाशी निश्चित करून त्याप्रमाणे आपले अनुभव शब्दांतून वळवीत नेणे हीही गोष्ट मी केली नाही.

कवि-व्यक्तिमत्त्वात बदल अथवा संक्रमणे होतात हे मी मानतो. परंतु त्यात विकास होतो किंवा त्याची अधोगती होते असे मी मानत नाही. म्हणूनच, अमुक एका कवीच्या कवितेला बहर आला आहे किंवा अमुक कवी आता संपला अशा प्रकारची भाषाही मला पटत नाही. प्रारंभिक दशेत अनुकरणशील आणि अप्रगल्भ अशा प्रकारची कविता लिहिली जाणे स्वाभाविक आहे. परंतु इतरांहून वेगळे असे स्वत:पण कोरणे हा कवितेचा मुख्य उद्देश आहे हे ज्या दैवी क्षणाच्या स्पर्शाच्या वेळी कवीला उमगते त्या क्षणापासून कवी हा कविताच लिहीत असतो. त्या क्षणाचा स्पर्श आयुष्यात अधूनमधून भेटतो आणि त्या वेळी कवी चांगले लिहून जातो. म्हणून उत्पत्ति-स्थिति-लय हा जीवशास्त्रीय नियम कवितेला लावू नये. वृद्धावस्थेतही कवी अचानक एखादी अम्लान कविता लिहून जाईल. त्याचा हिशोब मांडणे योग्य वाटत नाही.

सूर्याखालाचे सगळे काही, माणसाची स्वत:शी–समाजाशी–नियतीशी असलेली नातीगोती मला स्वीकारार्ह वाटतात. म्हणूनच जगत असताना येणारी प्रत्येक अनुभूती मला काव्यलेखनासाठी

विचारार्ह वाटते. अर्थातच, पंचेंद्रियांनी आस्वादता येतील अशा पातळी-वर गेलेल्या, स्थलकालातीत होऊन मनात अवतरलेल्या अनुभूतीच मी शब्दांत कोरण्याचा प्रयत्न करतो. अशा प्रकारे जेव्हा मी कविता मनात फुलवू लागलो तेव्हा मला प्रकर्षाने असे जाणवले की जणू मी कोणी त्रयस्थ आहे आणि आता दूरस्थ कुणाचे तरी शब्द मी ऐकतो आहे. त्या शब्दांतून एक प्रतिमा घडत जात आहे आणि मी स्वतःच्याच अनुभूतीचा साक्षात्कार तटस्थपणे घेत आहे. जेव्हा मी स्वतःसाठी लिहितो असे म्हणतो तेव्हा मी लोकांसहवर्तमान असतो. हे स्वतःत असून स्वतःवेगळे असणे कविता-निर्मितीच्या दृष्टीने मोलाचे असते असे मला वाटते.

कवितेतून एक दृक्‌चित्र प्रकट व्हावे, ते वास्तवाशी संलग्न तर असावेच पण विलगही असावे. ते चित्र अंतःचक्षूंसमोर आकारत जात असतानाच सूचकपणे आणखीही काही ते सांगत आहे असे जाणवले पाहिजे आणि ते चित्र पूर्ण होताच एका निर्वेदाच्या अवस्थेत कलात्मक भूमिकेवरून आपण गेलो आहोत असे वाटले पाहिजे. म्हणूनच मी अपरिहार्यपणे 'प्रतिमे'कडे वळलो. उपमा, उत्प्रेक्षा, रूपक इत्यादी साम्याधिष्ठित अलंकारांहून वेगळ्या अशा बिंब-प्रतिबिंब-भावापासून विलग होऊन आशय नि अभिव्यक्तीची अभिन्नता दर्शवणाऱ्या 'प्रतिमे'चे महत्त्व मला अधिक वाटले. कवी आणि रसिक यांच्यातील परस्परसंवाद प्रभावीपणे घडून येण्यास प्रतिमा अधिक साह्यकारी होते असा माझा समज आहे. अर्थात याहून वेगळ्या वाटेने जाणारी तरीही अधिक परिणामकारक कविता लिहिता येतेही आणि तशी आजच्या मराठी कवितेत लिहिली जाते आहेही.

कवितेच्या प्रारंभापासून अंतापर्यंत जशी एकच एक प्रतिमा असू शकते, तशीच, कविता हे अनेक प्रतिमांचे संकलनही असू शकते. मात्र ह्या सर्व प्रतिमा परस्पराधिष्ठित अशा असायला हव्यात आणि त्यांतून सर्वांना सामावून घेणारी—किंबहुना त्यांच्यापरते अस्तित्वच नसलेली—एक मात्र प्रतिमा घडायला हवी, असे मला वाटत आले आहे.

हे झाले अनुभव अभिव्यक्त करण्याच्या माझ्या वैयक्तिक प्रक्रियेसंबंधी. याइतकीच महत्त्वाची गोष्ट आशयाची. अमुकच एका प्रकारचा आशय कवितेत ग्रंथित व्हायला हवा हा आग्रह, मला वाटते, कवीने ठेवू नये. असे वाटते की जेव्हा कवी असा आग्रह ठेवतो तेव्हा त्यालाच नकळत स्वतःचे स्वातंत्र्य त्याने गहाण टाकले असते. कधी एखादे व्यक्तिमत्त्व, कधी एखाद्या सामाजिक समस्येने निर्माण केलेली भावस्थिती, कधी विमनस्क करून सोडणारी आध्यात्मिक अवस्था, कधी निर्मितिप्रक्रियेचे तर कधी लैंगिक जाणिवेचे विचारविकार— काहीही कवितेत अवतरू शकेल. कधी बेफाम उद्विग्न होऊन, कधी पिसाटपणे जीवनाच्या प्रेमात पडून, कधी अंतर्मुख होऊन तर कधी अबोध कुतुहलाने, असे अनेक प्रकारे आपण अनुभव घेतच असतो. हे सगळेच अनुभव कवितेचे विषय व्हावेत. इतके काही पाहण्या-अनुभवण्यासारखे असते नि पाहता-अनुभवता येतेही, ते सारेच काव्य-विषय व्हायला कवीने स्वतः आडकाठी करू नये. अर्थातच ज्या अनुभवांत स्थलकालातीत होऊन, स्वतःत पूर्ण होऊन उभे राहण्याची क्षमता असेल ते तसे कलात्मक रूप धारण करून उभे राहतीलच; पण पंचेंद्रियांकडून आलेले व व्यक्तित्वाने स्वीकारलेले अनुभव अपुरे आणि निर्जीव आहेत का हे कवीला पाहता आले पाहिजे. खरे म्हणजे ज्या अनुभवाने कवीला आतून उजळून आल्यासारखे वाटेल तो कलात्मक अनुभव. याचे तार्किक विश्लेषण शक्य नाही. हेच तर कवितेचे वेगळेपण. आणि तिची मातब्बरी.

मराठी कवितेत वेळोवेळी आलेल्या प्रवृत्ती पाहिल्या तर कोणतीही प्रवृत्ती चिरस्थायी ठरलेली नाही—आशयासंबंधी किंवा अभिव्यक्तीसंबंधीही. साचेबंद होऊ लागलेल्याची तोडमोड करीत आणि नवीन काही घडवीत कवितेचा प्रवाह वाहत आलेला आहे. आक्रमक किंवा आव्हानात्मक अभिनिवेशाने स्वतःची चीड व्यक्त करणे एवढेच उद्दिष्ट ठेवून कविता लिहिणे हीही स्वतःची दिशाभूल आहे. असे अनुभवही कलाविषय होऊ शकतात, पण कवितेला त्यांच्यापुरतेच सीमित करणे

म्हणजे स्वतःच्या कवि-व्यक्तित्वाच्या वाढीवर स्वतःच बंधन घालणे होय. सामाजिक क्रांतीच्या जाणिवेने एकत्र येणाऱ्या संघटनेतील तरुणतरुणी प्रेम करतात, लग्न करतात नि त्यांना मुलं पण होतातच. यापाठोपाठ वात्सल्यही आलेच. मग प्रेम, वात्सल्य, वासना ह्या गोष्टी, क्वचित स्वतःलाच अर्थ न लागणारी विमनस्कता, हेही येतेच. सुंदर गोष्ट पाहिल्यावर आनंदाची भावनाही उचंबळून येते नि मृत्यूच्या दर्शनाने माणूस थिजूनही जातो. हे सारेच मला स्वीकारार्ह वाटते. कलात्मक पातळीवरून विमनस्कता नि गाढ दुःख हेही मला आनंददायक वाटते. निदान माझ्यापुरती तरी ही गोष्ट मी बंधनकारक आहे. मी जर बांधिलकी स्वीकारली असेन तर माझ्या स्वातंत्र्याशी आणि कलात्मक आनंदाशी.

आयुष्यात जळून, कोळपून, करपूनदेखील मी सर्वच लौकिक अनुभवांकडे थंड अलिप्तपणे पाहत आलो. अर्थातच अवघे व्यक्तिमत्त्व घुसळून टाकणारे अनुभव घेत असताना त्या वेळेपुरता जरी मी अत्यंत हर्षभरित किंवा दुःखाने वेडापिसा झालो, दिङ्मूढ झालो किंवा भयभीत झालो तरी तो प्रसंग खांद्यावरून परता होताच जणू दुसऱ्याच कुणाच्या तरी आयुष्यात घडल्याप्रमाणे मी त्याच्याकडे पाहत गेलो. यातूनच जे अनुभव मला सार्वकालिक नि व्यापक वाटले ते मला कवितेसाठी योग्य वाटले.

कविता शब्दाश्रयी असते हे तर निश्चितच. पण ती केवळ शब्दाश्रयी असणे मला पसंत नाही. ध्वनीचे आकार आणि स्फोट यांतून भावावस्था प्रकट होते हे तर खरेच, परंतु शब्द, वाक्य, कवितेचे स्वाभाविक व्याकरण यांतून एक चित्र प्रकट व्हावे असे मला वाटते. माझ्या कवितेला कथात्मक घाट बऱ्याच वेळा येतो नि अशा अलग अलग कथांतून माझी स्वतंत्र अशी प्रतिमा घडत गेली आहे असे वाटते. परतु असे मी केले मात्र नाही; ते घडत गेले. माझ्या आयुष्यात यापुढे मला जे अनुभवावे लागेल त्यानुसार कवितेतून माझी प्रतिमा उभी राहत जाईल. कोणताही अभिनिवेश न ठेवता माझ्या प्रत्येक

स्वतंत्र अनुभवाचे शिल्पीकरण करणे एवढेच माझ्यापुढे आहे.

प्रतिमांतील घटक पुनरावृत्त होणे हे स्वाभाविकच आहे—जसे माझ्या कवितांतून पक्षी, गवत, चिता, घोडा, संन्यासी इत्यादी घटक पुनरावृत्त होतात. परंतु हे घटक प्रत्येक कवितेत स्वतःची अशी नवनवी संकल्पना धारण करून आले पाहिजेत. त्या घटकांनी अर्थाचे नवेच दालन उघडल्यासारखे वाटले पाहिजे. महाभारतात युद्धपर्वाच्या अखेरीस सर्वनाशाचे दर्शन घडलेल्या चोरास हत्तीच्या घंटेत सुखरूप असलेली पोपटाची पिले आढळतात आणि त्यास चक्रावून घेतल्यासारखे वाटते. असे हे वाटणे खरे महत्त्वाचे. पोपटाची पिले निमित्तमात्र. त्यातून प्रत्ययाला येणारा व्यासाचा दृष्टिकोन महत्त्वाचा. परंतु तरीही व्यासाला पोपटाची पिले हे जीवनाचे प्रतीक बुद्ध्या करावयाचे नाही. ती एक सरळसाधी गोष्ट आहे आणि नेमके काही न सांगता ती अनेक गोष्टी सुचवून जाते. एवढे सामर्थ्य कवीपाशी यावे, इतके सहज तरी इतके गहन होण्यासाठी त्याने धडपडावे, असे वाटते. माझा आनंद आणि माझ्या यातना या वाटेवरच्या प्रवासातून निर्माण झालेल्या आहेत.

कवीच्या लौकिक जीवनाचा त्याच्या कवि-व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत फार मोठा भाग असतो असे मला वाटते. आयुष्यात ओढघस्त, यातना, वैफल्य, स्वातंत्र्याची गळचेपी असे ज्याला अनुभवावयास मिळाले नाही त्याला स्वतःच्या वा इतरांच्या जीवनांकडे समंजसपणे पाहता येणार नाही. आपण एक गवताचे पाते आहोत आणि (कबीराने म्हटल्या-प्रमाणे) मुंगीच्या पायातील घुंगराचा नादही ज्यास ऐकू येतो असे विश्ववास्तव आपणात आणि आपल्यापलिकडे सर्वत्र भरून आहे अशी भावना झाल्याखेरीज आत्मविस्मृतीही होणार नाही किंवा आत्मप्रबोधनही होणार नाही.

जन्म, मृत्यू, वासनाविकारांची बदलती रूपे, निर्मितीची प्रक्रिया, नियतीची नि जीवनाची गूढता, अनपेक्षितता, भीषणता नि सुंदरता, स्वतःलाच शोधण्याची ओढ, नियतीशी टक्कर देण्याची नि टिकून

राहण्याची आदिम ओढ, अशा असंख्य मूलभूत गोष्टींची जाण यावी लागते. जीवन स्वीकारतानाच ह्या गोष्टींकडे कलावंत आकृष्ट झाला पाहिजे. मग साध्यासुध्या अनुभवांकडेही पाहण्याची त्याची वृत्ती भेदक होत जाईल. माझा प्रवास याच दिशेने चालू आहे. निदान तसा प्रयत्न तरी मी करीत आहे.

तत्त्वज्ञ, कलावंत, मवाली इत्यादी मंडळी आवश्यकत: आत्यंतिक असतात. रिंबो नि डिलन थॉमसची उदाहरणे तर सुप्रसिद्ध आहेत. वेश्येला कान कापून देणारा व्हिन्सेंट व्हॅन गॉफ काही वेगळा नाही. स्वत:च्या मनोविभ्रमांत वेडेपिसे होऊन जगणे आणि आत्यंतिक टोकाला जाणे हे कमीअधिक प्रमाणात सर्वच कलावंतांच्या बाबतीत घडते. अदृष्ट तरीही सत्य गोष्टीच्या भासाने ते लौकिक चौकटीच्या पार जाण्याची धडपड करीत असतात आणि इथेच त्यांच्या लौकिक अपयशाची आणि आध्यात्मिक आनंदाची सुरुवात होते. यातून जाताना अवघे आयुष्य होरपळ होऊन जाते. जीवनसत्य प्रस्थापित करण्याऐवजी भाववून घेण्याची ही धडपड कलावंताला दैवी असमाधान मिळवून देते. यातूनही ते जीवनसत्य शब्दांतून प्रकट करताना होणारा आटापिटा, त्यात वारंवार येणारे अपयश यांतून कलावंतांची घडण होत जाते. हे सगळे स्वीकारत गेले तरच कवी हा कवी होतो. यापासून पळ काढणारा नुसताच पद्यकार म्हणून उरतो. हे इमान कसोशीने सांभाळता आले पाहिजे. दिसामासाने ओटीपोटात वाढणारी आग आनंदाने जपली-जोपासली पाहिजे. मला हे कितपत जमले आहे याचे उत्तर माझ्यापाशी नाही. पण हे मनात जागते ठेवून मी सहजपणाने जगतो आहे.

—गुरुनाथ धुरी

# समुद्रकविता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२३५८
वा. क्र. काव्य
२३५८
स्थळ

## समुद्र

समुद्र पहातांना एकांतरात्रीं एकट्यानेच
मला आठवतोस तू : समुद्रवेडा आणि तुझ्या समुद्रकविता...
तलतचीं गाणी, आईच्या मृत्यूचा शोक,
स्मशानभिंतीवर रेखाटलेले उडते पक्षी...
तुझीं सुखं आणि दुःखं : सारींच समुद्रानं ओरबाडून नेलीं
पण समुद्राशी तू नेहमीच कृतज्ञ राहिलास समंजसपणे
इतर कोणत्याही गोष्टीवर लघवी केलीस बिनधास्त तरीही
समुद्रांत मात्र कधीच नाही...कधीच

खूप वर्षं झालीं त्याला
किती किती समुद्र तुझ्यामाझ्यांतून ओसरून गेले !

नंतरच्या तुझ्या आठवणी सचिवालयांतल्या
डोळ्यांतला समुद्र आटवीत तू निमूट करकुनी केलीस
समुद्राने घेरलेला तू : आता तुझ्याभोवती फायलींचं जंगल
आणि चेंबर्सच्या गुहागुहांतून हिंस्र श्वापदं
तिथे आपण नेहमीच समोरासमोर येत असू
पण कारकुनी जगांत समुद्राला मज्जाव असतो
आणि क्षणभर थांबून मनापासून बोलावें
असे किनारेच आपल्याला सापडले नाहींत

नंतर तू नोकरी सोडलीस अचानक. किती शांतपणे!
कोणालाच कारण कळलें नाही. नंतर कितीतरी दिवस वाटायचें—
गेला असशील कँटिनमध्ये चहा प्यायला;
येशील एवढ्यांत!

समुद्र पाह्यला होता—आता मला समुद्रांतला वडवानल दिसला
तू निघून गेलेला कळलें दूरच्या जिल्ह्यांत
अकिंचन भूदासांचा आत्मविश्वास जागविण्यासाठी.
त्यांच्याचसारखा फाटका.
अरे, कुठल्या समुद्राने घातला होता
त्याच्यावरील आकाशांतला सूर्य
तुझ्या ओटींत ?

त्यानंतरची तुझी भेट तुझ्यावर झालेल्या खुनी हल्ल्यानंतर
मोडलेल्या हातापायांवरील उपचारासाठी या महानगरांत आल्यावर.
खूप बोलायचें होतें, खूप बोलून झालें,
खूप बोलायचें राहून पण गेलें...
" किती दिवस पहातोंय मी या ऑर्थोपिडिक्समध्ये
माणसांचीं हाडं करवतीनं कापतांना, भोकं पाडून स्क्रू पिळतांना;
वाटतं की साला माणूस म्हणजे माणूस नाहीच—
नुसताच आपला टेबलखुर्ची !" आणि पोरासारखा हसलास...
मग अचानक गंभीर होऊन म्हणालास,
" टेबलखुर्चीच, पण फुलं येणारी...लाल रसरशीत फुलं..."

अलिकडेच तू लिहिलेलें वाचलें कुठेतरी :
" माणसाला शोधायला समुद्राकडे गेलों, आता समुद्र शोधायला
माणसांत जात आहे..."

आज समुद्र पहातांना एकांतरात्रीं एकटयानेच
मला दिसतोस तू सर्वदूर पसरलेल्या माळावर
कांटेरी निवडुंगाप्रमाणे
शीर्षावर लाल जळता डोळा उघडून उभा राहिलेला.

## मातीभरली कुंडी

फुलझाड मरून गेलं. तें त्याने उपटून टाकलं.
नुसतीच मातीभरली कुंडी उरली, आकाशाकडे तोंड वासलेली...
काळ्या कीटकांची आंतबाहेर सुरू झाली...

मीं एकदा अर्थपूर्ण रीतीने त्याच्याकडे पाह्यलं.
त्यालाही तें कळलं. तो मग ओरडतच सुटला
अनेकांना शिव्या देत, वाभाडे काढीत,
जुन्या कडवट प्रसंगांच्या आठवणींची थुंकी उडवीत...
शेवटीं एकाच फटकाऱ्यांत कुंडी उडवून दिली त्याने
आणि थकून खुर्चीत पडला. गप्प. धांपा टाकीत.

फार वेळाने तो शुद्धीवर आला
तेव्हा एखाद्या लहान मुलासारखा निष्पाप अन् गोड
वाटत होता त्याचा चेहरा
डोळ्यांत जमून येऊ लागले होते
आणखी एका नव्या प्रारंभाचे
अधिकच जिवंत रंग...

जणू एक मातीचं भांडं फुटलंय
आणि अवघा काळोख मोकळा झालाय !

## विलक्षण शांततेची बोट

डेकवर माणसं पसरलींयत आरामखुर्चींत
पसरल्यापसरल्या कांहीच दिसत नाहीय आभाळाशिवाय
नुसता निळसर रंग
कुणास ठाऊक किती युगं चाललीय ही बोट किती युगं चालणाराय

पडून पडून आळसावल्यासारखं झालंय
चला, उठून कठड्याशी जाऊं
ओऽहो, समुद्रांत हे कितीक रंग...
अन् हें काय ?
पळणाऱ्या रंगीबेरंगी मोटारी, माणसं, इमारती नि काय काय...
म्हणजे, म्हणजे काय ?
समुद्र आटून गेला की काय ?
आणि मग हें नगर कुठचं ? ही संस्कृती कुठची ?

वाजले तरी किती ?
बापरे ! माझ्या घड्याळाचे कांटेच हरवलेत !
आणि डेकवरच्या खुर्च्यांतील माणसं कुठायत ?
ही काय भुताटकी !

माझं मन या रंगांच्या प्रचंड नगरींत.
एकटीच नांगरून पडलेली विलक्षण शांततेची बोट
जिच्या डेकवर एकटाच मी उभा
अनुभवत विराटसुंदर रंगीत भास...

## झाडांनो

झाडांनो
मी कोवळा होतों
तेव्हा तुम्हीही कोवळींच होतां
वाढत होतां
तेव्हापासून मी तुमच्यावर अपार प्रेम करीत आलों.
तुमच्या वाढत्या शेंड्यांकडे पहातांना
अलगद नजर वर उचलली जायची
वरचं अफाट आभाळ दिसायचं,
वर वर येणारा सूर्य दिसायचा,
मला आपोआपच उंच झाल्यागत वाटायचं.
असंही वाटायचं की
वाढतां वाढतां एखाद्या क्षणीं
जमिनीची पकड असह्य होईल
आणि तुम्ही आकाशांत उंच उडाल
तुमच्या फांद्याफांद्यांवरील पक्ष्यांसारखे

तें कोवळेपण संपण्यापूर्वीं
दुर्दैववशात् मी फेकला गेलों या परक्या निर्मम शहरांत
तेथेही तुम्ही मला भेटलांत, पण किती बदललेलीं...
तुमचीं मुळें जमिनींत खोल शिरलीं होतीं
तुम्ही बलदंड होऊन
चहूंअंगांनी विस्तारलां होतां
इतकीं की तुमच्या विस्ताराने वरचें आकाश दिसेनासें झालें
उन्हापावसाला, चंद्रताऱ्यांना मी पारखा झालों
तुमच्या हिरव्या कोवळ्या सावलीचें

काळें सांवट झालें
आणि नंतर एक प्रचंड पाशवी गुहा...
तुमच्या जवळून चालतांना मला विलक्षण खचल्यासारखें—
क्षुद्र वाटतें आतां

झाडांनो, माझ्या आयुष्यांतून, कवितांतून
मी आता तुम्हांला कायमचें वगळलें आहे
तिरस्कारानेही मी तुमचा उल्लेख करणार नाही
तेवढीही किंमत राहिली नाही तुम्हांला !

## एका आयुष्याचा अर्थ

गारठ्याची रात्र...
मिट्ट काळोख...
फुटपाथवर एकाकी जळणाऱ्या दिव्याच्या
भकास उजेडाचं फिकं फिकं वर्तुळ
: या उजेडांत क्षणभरच आलं कोणी काळोखांतून
अंगाभोवती लक्तरलेली चादर गुंडाळून, कुडकुडत, पाय ओढत...

आणि क्षणार्धांत उजळून गेला
एका आयुष्याचा अर्थ
कोंडलेल्या हुंदक्यासारखा...

## काळोखांतून काळोखांत सरकणारीं आयुष्यं

काळोखांतून काळोखांत सरकणारीं आयुष्यं
काळोखाला येणारा काळोखाचाच बहर
अनंत मरणं साहत, अज्ञाताचीं ओझीं खांद्यावर वाहत
आम्ही चाललेले डोंगरदऱ्यांतून, नदीनाल्यांतून, वाळवंटांतून
आम्ही आमच्याच अस्पष्ट सांवल्या

जीवन वगैरे सर्व कल्पनाच. खरं असतं तें जगणं.
आयुष्यदेखील नाहीच !
फक्त पुढच्या क्षणांची वाट पहात त्याला तोंड देणं
पराभव घेण्याची तयारी ठेवून...
कुणी आयुष्यांत बेचिराख होतो क्षुल्लक चुकीने स्वतःच्या
किंवा इतरांच्या, कुणी नियतीच्या इच्छेने, कुणी करतो
स्वतःच्या आयुष्याची राखरांगोळी इतरांनी घालावी रांगोळी
त्यांच्या घरासमोर म्हणून

एक एक माणूस असा उठून जातो निबोलकेपणे
एखाद्यालाच लाभतं एखादं माणूस त्याच्यासाठी रडणारं
पण मेल्यावर तर सगळं शून्याकारच. कदाचित
मरणाआधीसुद्धा. तें तर जिवंतपणींचं मरण
देवदासच्या पार्वतीसारखं.

कोणीतरी भेटतं अनेक अनेक वर्षांपूर्वीच्य. आठवणी डोळ्यांत घेऊन.
आठवणी : उंबरठा न ओलांडणाऱ्या
तरीही आयुष्य गोळा होऊन आलेल्या एकाच क्षणाच्या दृष्टिक्षेपांत.
सगळ्या बाहुल्या खळाखळ कोसळतात

अशी भेटूं नयेत माणसं. त्याआधीच मरण याव
त्यानंतर अत्र ना परत्र.

आणि असंही होतं :
व्यवहाराच्या बांधबंदिस्तींत जगतांना आपण स्वत:लाच हरवून बसतों.
कितीही सांभाळले नियम गणिताचे,
तरीही उत्तर जमत नाही. तेव्हांही वाटतं, हें मरणच. जिवंतपणीचं.
किती परकेपणाने सळसळतात तेव्हा खिडक्यांचे पडदे
नि भणभणतात पंखे
किती शोकमग्न वाटतात सगळे कपडे आणि खाटा

इथून तिथून वरून खालून आजूबाजूंनी कसलं तरी भयद अदृष्ट
चालून येतं
आयुष्याची एक एक ढलपी गळून पडते
आणि एक विकृतच तेवढं
अमावास्येच्या भुतासारखं भिववीत रहातं
एक सावकाश मरण काळ्या ढगांसारखं छातीवरून आभाळत वहातं.

## झगा

तिनं काढला झगा नि चांचपूं लागली अंगअंग
तर झगाच काळोखांतून पहात अंगभर डोळ्यांतल्या लालसेनं...
ती लाजेनं चूर !

## फुलांचा गुच्छ

त्याच्या मनांत कुठेतरी खोल एक फुलांचा गुच्छ आहे
एरव्ही तो उभा जळालेला
वाढदिवसाला तो स्वतःलाच तो गुच्छ भेट देतो

तसें कांहीच नाही त्याच्या आयुष्यांत
उदास करणाऱ्या आठवणी, उदास रस्ते आयुष्याचे...
कधीकधी चिडतो तो स्वतःवरच
पण तरी तो अजून वेडा नाहीं झाला

कधी रात्रीं खिडकींतून चंद्राकडे पहातांना
हळूहळू वितळतं त्याचं उदास आयुष्य,
वितळतात आठवणी, वितळतं सगळं शरीर...
नुसताच उरतो तो फुलांचा गुच्छ !

आणि त्या रात्रीपासून
एक नवं आयुष्य सुरू होतं !

## A Language of Flesh and Roses : १

' A language of flesh and roses ' :
तुझ्या डायरींतील ही एकच ओळ, स्पेंडर,
" कधीतरी करीन मी ही पुरी आयुष्यांत—" म्हणाला होतास
ठाऊक नाहीय मला पुढं तिचं काय केलंस तूं तें

मी मात्र बुडून गेलों माझ्यापुरता त्या ओळींत
आणि लिहिली ती शब्दांशिवाय माझ्या मनांत
जेव्हां मला आठवली ती मुलगी
कसं कोरून लिहीत होती आपल्या राजपुत्राचं नांव
वहीच्या शेवटच्या पानावर
आणि मान वाकडी करून त्यांत मन बुडवतांना
कसे गुलाब फुलत गेले तिच्या गालांवर लज्जेचे...

## A Language of Flesh and Roses : 2

म्हातारा खुरडत खुरडत
अंधाऱ्या खोलींत गेला
तेथे ती बसली होती अंधारांत मुडपून
: अपुरी, निस्तेज, वहींत बुडालेली...
" बाळ, तुझं दुःख मला आयुष्यभर
दूर करता आलं नाही ..." म्हातारा गदगदला.
" जाऊ द्या पपा...तुमचा काय दोष.
कवितेची ओळ काय किंवा जन्मलेलं मूल काय—
त्यांच्या वाढण्या-खुरटण्याचीं बीजं
त्यांच्यांतच असतात सामावलेलीं."

आता झरोक्यांतून आलेल्या कवडशाचा
झिरझिरीत पडदा
फिरत फिरत
त्या दोघांच्या मधोमध स्थिरावलेला...

## ऑपरेटर

आपण असतों एकटेच लिहीत मेजावरील दिव्याच्या वर्तुळांत
खिडकी असते उघडी आणि रात्र.
आपलं मन असतं म्हणजे दर्याच एक दुरून कोसळत फुटत
ऐकत अनिवार स्वतःतील अनाहत काळोखनाद आपल्याशा अशा
एकटेपणाच्या माडझांवळयांतून

आणि खिडकींतनं तर कांहीसुद्धां नसतं बाहेर सळसळत—
पानंच निव्वळ काळोखाचीं. एरवीं शांततेंत
गढावं खूपच खोल तर आपलं चिमुकलं हृदय
अस्पष्ट चित्कारतं सुखानं भयानं वेदनेनं आशंकेनं किंवा कशानं
तेंच समजत नाहीं आणि न समजणंदेखील
किती सुखाचं असतं की कशानं

एक एक अक्षर उमटून सरकत असतं आंतबाहेरच्या सीमेवरील
उजेडाच्या गोलगोल भिगांतून फिल्मसारखं
नि गुंडाळलं जातं दृष्टीआड
जशीं कोटयवधी वर्षं चाललींत ओळीनं
सुखदुःखभयव्यामोहआशानिराशेचीं ओझीं घेऊन काळोखांत
नि पुन्हां नवं अक्षर असं संपत नाहीं कधीसुद्धां कधींच

अतिशयच सनातन बंदपणांत आपल्या काळोख तटस्थ ऑपरेटर

## कविता

अंधारवस्त्राप्रमाण उतरून शब्दांचे आकार
ती होते नग्न आशयाच्या उंच गर्भगृहांत
बाहेर जग आहे उन्हांत हलणाऱ्या पानांचें,
वावरणाऱ्या माणसांचें, आगगाड्यांचें, कोळशाच्या खाणींचें,
युद्धाचें, घामाचें, दुःखाचें
त्याचे अन्वयार्थ कसे निमूट येतात या गर्भगृहांत
शरीराचे वस्त्र उतरून बाहेर पडणाऱ्या आत्म्यांप्रमाणे
अथवा रंग उतरून हॉलबाहेरच्या काळोखांतून
घरी जाणाऱ्या नटांप्रमाणे

तेथे ती एकटीच उरलेली आणि सभोवती अदृश्य सभा
जसा जाणवावा कुणास ऐतिहासिक अवशेषांच्या जागीं
कधीकाळीं भरणारा वैभवशाली दरबार. ती उतरते
शब्दांचे आकार जे पडतात तिच्या पायाशीं सळसळत
आता ती मुक्त आहे भान विसरून आणि
सळसळते

## बर्फाच्या एका शहराचं छायाचित्र

बर्फाचं शुभ्र शहर
बर्फाचीं माणसं, बर्फाचीं घरं, बर्फाचीं झाडं
गाड्या कारखाने ऑफिसं सगळं कांही
बर्फाचं घडलेलं

त्याचं मीं एक छायाचित्र घेतलं
लाइफ साईझ वाढवून भिंतीवर टांगलं
अन् बघत राह्यलों त्याच्याकडे खिडक्यादारं बंद करून
त्याच्या पायथ्याशी रेखाटलं मीं
काळ्या कुरळ्या रेषांनी
आंगठ्याएवढं माकड...विदूषकासारखं नाचणारं...

रेखाटलं मात्र—
सारं शहरच वितळून गेलं
माझ्या विटामातीच्या घरांत
वितळून सांचलेलं शहरच शहर...
त्यांत बुडून गेलेला मी...

## पाखरांच्या गाण्याप्रमाणे

पाखरांनी गाऊं नये तर काय करावें ?
त्यांनी चोची उघडायच्या असतात त्या कंठांतील आरव
प्रस्फुटित करण्यासाठीच
त्यांच्या गाण्यांना कोणीच नाही बंदी करूं शकत
तीं अवतरतात
प्रत्येकाच्याच आयुष्याच्या वसंतकाळीं
प्रातःरमणीय बागेप्रमाणे
किंवा कविमनाच्या धूसर डेकवर
सामुद्रीय गाजेने भरून समुद्रपक्ष्यांप्रमाणे
कधीं क्यूबाच्या रस्त्यारस्त्यांच्या फाटलेल्या आंतड्यांतून

एक ताफा येतोय...येतच आहे अनादि काळापासून
कवींचा वा क्रांतिकारकांचा
पाखरांच्या गाण्याप्रमाणे दीप्तिमान...

## सर्वांच्या सर्व चेहऱ्यांच्या आठवणी

सर्वांच्या सर्व चेहऱ्यांच्या आठवणी काळोखल्यावर
आम्ही असतों नुसतींच काळोखांत किलबिलणारीं,
नव्हे, आक्रोशणारीं झाडें
हें असें आमच्याच अस्तित्वांतून कधीं उडतांच येत नाही बाहेर
सर्वच सर्वनामें निराकार अंधारांत लुप्त झालेलीं...
सर्व मिळून अंधाराचाच चेहरा

माणसें, माणसांच्या आठवणी, संबंध...
सारेंच कसें निरर्थ वाटू लागतें
उघडया घोरणाऱ्या जबडयाची इवलीशी भक्षक पोकळी नाकारून
उडण्यासाठीं प्रेरणा देणारी
उघडया आकाशाची पोकळीच तेवढी वाटते खरी !

आठवणी हरवतात, माणसें हरवतात, संबंध हरवतात
तेव्हांच निखळून पडतात जडतेचे दुवे
आपण उरतों एकटे जेव्हां...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## राजा

राजा : जो असतो एक अलिखित मुकुट
काटेरी
थरारतात ज्याच्या शब्दांच्या धारेने
अरण्यांतील पर्णरेषा, माणसांच्या नसा थंडावतात

घोर निळ्या रात्रीं अरण्यगुहेंत
तो एकटाच ऐकत रहातो स्वतःचें रुदन. तो पडतो एकाकी
दारूच्या पेल्यावरील
वाळलेल्या थेंबासारखा

राजा असतो बंदिस्त भिंतींतील
शून्य रिकामेंपण. हजारों प्रजाजन त्याचे
गेलेले निघून
सोडून मागे मातीचें शून्य राज्य त्याचें...

आणि एक राजा असतो जो
खिळ्यांच्या शय्येवर असला पडलेला
तरीही काढीत नाही मुखांतून वेदनेचा उद्‌गार
त्याचे कोंडलेले शब्द करतात त्याच्या शवाभोवतीं
एक राज्याचा कोट उभा
अदृश्य, अमानवी आणि चिरकालीन
आणि येतात रुजून सूर्याकडे पहात भूमीखालून...

## कॅफे आयडियल

भव्य कॅफे आयडियल जळत होतं मध्यरात्रीं एकटंच
जळत होतं फर्निचर, कोसळत होते खांब, तुळया,
फुटत होते उंच उंच आरसे तडातड
सारा फोर्टचा रस्ता झगमगत होता
वैभवशाली रोषणाईने कॅफे आयडियलच्या

कॅफे आयडियल :
जिथल्या अपुऱ्या रहस्यमय उजेडांत मीं वाचला होता बोदलेअर
थरारलों होतों आणि भानावर येऊन
वारुळांतून प्रथमच बाहेर पहाणाऱ्या
सापाच्या पिल्लाप्रमाणे सभोंवार पहातांना
दूर दूर पसरत गेलेल्या आकृत्या टेबलाभोवतींच्या
वाटल्या होत्या थडग्यांतील मृतात्म्यांसारख्या.
खळखळले होते आरसे निळ्या जांभळ्या अंजिरी गूढ रंगांनी आणि
हळूच अद्‌भुत हृदयाचं झुंबर पेटत गेल्या होत्या
शब्दांच्या मेणबत्त्या पटापट एकामागून एक.
कॅफे आयडियल जळत होतं आकाशापर्यंत पोहोचणाऱ्या ज्वाळांनी
आणि दूरच्या गल्लीबोळांतील सुरक्षित अंतरावरून
पहात होतीं किड्यामुंग्यांसारखीं माणसं
दिङमूढ, भ्यालेलीं !

सुतकासारख्या उगवलेल्या फटफटीत सकाळीं
कॅफे आयडियल होतं फोर्टच्या गजबजलेल्या रस्त्यावर उभं
काळंकुट्ट, विद्रूप...
समोर माणसांच्या काळ्या रेषांचे थवे

चर्चा करणारे, हळहळणारे
जळूनही प्रचंड उरलेल्या कॅफे आयडियलच्या पायाशी

कॅफे आयडियल उभं आहे उद्ध्वस्त, छत कोसळलेलं
माणसं हळूहळू विसरत चाललींत. लक्षदेखील जात नाही
कुणाचं अलिकडे सहसा
पण कॅफे आयडियल सांठवतंय आतां
एकाकी उगवणारा प्रत्येक जळजळीत सूर्य थेट हृदयांत
भडकूं लागलाय आतां त्याच्या डोळ्यांत फोर्टचा रस्ता तेजस्वी रंगांनी
लवलवतायत माणसांच्या सर्पाकार ज्वाळा झेपावतायत
प्रत्येक क्षण होतोय कॅफे आयडियलच्या सदैव रोखल्या डोळ्यांत
एक अपूर्व लयचित्र गति-नाद-प्रकाशाचं
रंग, रेषा नि आकारांत साकार होणारं
साक्षात्कारभ्रमिष्ट व्हॅन गॉफप्रमाणं !

## तुडुंब हिरवेंपण रानाचें

एक कावळा रानांत झेपावला, बुडून गेला
तुडुंब हिरवेंपण रानाचें
लाटांदर लाटांनी उसळलें

त्या लाटा आवरतां आवरतां
मनाचे कांठ ढांसळून गेले

## गोष्ट : कवीची आणि कविप्रियेची

एका उर्मट संध्याकाळीं
कविप्रियेने कवीला दु:ख दिलें
कवीने उचलून तें शांतपणे व्याजाला लावलें
ती चमकली जोडा बसल्यासारखी
स्वत:वरच चिडली, धुसफुसली, विझली

ती सदैव दु:खांत आतां
तिचं सर्वस्वच लुबाडलं गेल्याच्या
आणि कवीदेखील—
चक्रवाढीनं जमलेल्या अपरंपार मायेंतून
मूळ मुद्दल कधीच वजा होणार नाही
याच्या.

## परीकथेंतल्या किशोरीने

रक्ताला चटावलेल्या लांडग्याने
चांदणीकडे लाल डोळ्यांनी पाहिलें
आणि चांदणी निखळून पडली

परीकथेंतल्या किशोरीने
त्या चांदणीची आंगठी केली

## फुलाफुलांची चादर

तिच्या रक्तांतील भृंगे
त्याच्या सर्वांगावर
कानांत मनांत प्राणांत
त्यांचा गुंजारव

तिने टेकले त्याच्या ओठांवर ओठ
आणि वाजलं सारं अंतरंग
साऱ्या तनामनाचं
वृंदावन झालं

आतां त्यांतलं कांही उरलेलं नाही
नुसतीच एक विटलीफाटलेली
फुलांफुलांची चादर...

## तीन कविता : तिच्या

१.

रस्ता साधा सरळ सोपा
सोपंच त्यावरून येणं-जाणं
पण समोरासमोर आल्यावर आज
तूं थबकलास, मी थबकलें,
मधलीं सगळीं वर्षं थबकलीं...

२.

माझ्या आयुष्याच्या चार भिंती,
वर सुरक्षित छप्पर,
अंगणांत खेळणारीं माझीं मुलं...

कधीं अपरात्रीं मला जाग येते—
बंद दरवाजाशीं
कुणी उभं असल्याचा भास मला कां होतो ?
कां एकाकी वाटतं ?

३.

शुभ्र संगमरवरी निर्जनपणाच्या दाराशीं
टवटवीत पॉलिश केलेल्या पितळी कुंडीखालीं
पंख पसरून मरून पडलेला कावळा पाहिला
आणि भूतकाळांतल्या
एका क्षणाची आठवण येऊन
डोळे भरून आले...

## बाक : सार्वजनिक बागेतलं

डोक्याशीं डोकं जुळलेलं,
पायांत पाय :
बाक बसलंय प्रेम करत

●

बाक लपलंय
झाडामागं—
कुणावर राज्य आलंय ?

●

बाक मोकळं दिसतं;
जवळ जावं तर
बाक हळूच पाय लांबवतं

●

बाक जांभई देतं थकलेली,
पसरतं जुनंपानं वर्तमानपत्र
झोपतं कधीच छापून येऊं न शकणाऱ्या बातमीसारखं
अत्यंत सामान्य हळूहळू बुडतं काळोखांत.

●

बाकाच्या मनगटावर बसलं
एक फुलपांखरू

फुलपांखरू कधीं उडून गेलं
कळलंही नाही बाकाला
बाकच भिरभिरूं लागलं होतं रंगांनी स्वतःत !

## वसंत आबाजी डहाकेसाठी

अंधारांतून येणारे तुझे शब्दशर
फाडत जातात सुस्थापित शहर

आणि उजाडत जाणाऱ्या त्या उद्ध्वस्त दुपारीं
मी मलाच वाटतों फाडलेल्या प्रेतासारखा
मी मलाच वाटतों मला फाडणाऱ्या लांडग्यासारखा

अखेर नुस्तं उरतं तें तुझ्या कवितांतलं सत्य :
हाडं हाडं हाडं : डहाके !

## न पूर्ण उमललेलीं फुलं हीं

न पूर्ण उमललेलीं फुलं हीं,
न पूर्ण सुगंधित झालेलीं...
न पूर्ण रंग धारण केलेलीं...

हीं मुलं
एकमेकांशी बोटांच्या खुणांनी बोलणारीं
त्यांच्या स्मितांचे रंग विकसतात
माझ्या हृदयावर...किती पूर्ण
तरीही टाळतांच येत नाही मला ही
आंतून लागलेली व्यथेची कीड...

२२३५८
का०५
२३५२

## लकेर

कितीतरी वर्षांपूर्वी
लकेर घेतली एका पक्ष्याने
दूर दरींतून...
अजून घुमतेय ती
मनांत

त्या लकेरीला
फुटतात पानं
येतात फुलं
मन बहरतं गर्द

मन कधीं कोळपतं
पाचोळा सरसरतो सर्पासारखा
पण तेव्हांही
मनांत असते तीच लकेर !

## इशाऱ्याच्या रात्रीं

इशाऱ्याच्या रात्रीं आम्ही घराबाहेर पडलों
गच्चयांवर, रस्त्यांतून, चौकाचौकांत, झाडांवर, दुकानांच्या छपरांवर
जागा सांपडेल तेथे गोळा झालों
मग आम्ही थाळया वाजवल्या, रस्त्यांतले डांबराचे ड्रम वाजवले
रस्त्यांच्या नावांच्या पाटया, दुकानांचे शटर्स, चालत्या बसगाडया
अन् मोटारी बडवल्या
मोटारींचे फुगे दाबले, बसमध्ये घुसून घंटा घणघणवल्या,
पिपाण्या नि तोंडें वाजवलीं. एक अलौकिक नादब्रह्म निर्माण केलें.
एक पोलिसचौकी, दोन बसगाडया आणि कित्येक
पोलिसांच्या टोप्या जाळल्या
तोंडाने आम्ही घोषणा दिल्या 'त्यां'ना उद्देशून.
महागाई, बेकारी, किंमतवाढ, सांठेबाजी, टंचाई
आणि अशाच कित्येक पापांसाठीं
आम्ही 'त्यां'चे पुतळे करून जाळले चौकाचौकांत
जे आमच्यांत नव्हते त्या सर्वांनाच आम्ही 'ते' मानलें
कुणी टॅक्सीड्रायव्हरची टोपी उडवली,
कुणी मोटारमालकाला दम भरून
बायकोमुलांसहित खालीं उतरवलें
यथासांग पोचे काढले मोटारीला, कांचा फोडल्या,
टांग्यांत आरूढ झालों... असें खूपच कांही केलें

त्यांनी अश्रुधुराचीं नळकांडी फोडलीं
तेव्हां आम्ही गल्ल्यागल्ल्यांतून अड्डयांवर घुसलों, बेवडा ढोसला
'त्यां'चीं सगळी पापं जळत जळजळत
उतरूं लागलीं घशाखालीं
तसे आम्ही आंतून धुमसूं लागलों

मग आम्ही बाहेर पडलों
'त्यां'चे पुतळे अजून पूर्ण जळाले नव्हते
धुमसत होते
आम्ही संतापाने अनावर होऊन
हातांतल्या सळ्यांनीं
ते धुमसते पुतळे झोडपूं लागलों,
झोडपतच राहिलों...

## झणत्कार

खिडकीखालून ते गेले :
नुसतींच सरसरणारीं पावलं
आणि दबलेली कुजबूज...
नंतर ते वळणावर वळले. डावीकडे.
कारण किंकाळी डाव्या बाजूने आली.
वास्तविक तो यायला हवा होता परवा मध्यरात्रीं
कुठे गफलत झाली ? कोण फितूर झालें ?

कांहीच बातमी नाही. नुसत्या प्रेतवत् पिवळ्या भिंती
आणि बंद पडलेलें बिनतारी यंत्र.
सकाळ होऊं लागली आहे. खिडकीच्या भोकांतून पहातों
: हा सारा मृतप्राय परिसर
कांचाविटांचे तुकडे, रस्त्यावर रक्ताचे डाग

अद्याप त्यांना कळलेलें दिसत नाही. पण कळेल...

शिकारी कुत्र्यांसारखा ते माग काढीत येतील.
श्वास कसा दबलेला आणि गरम येत आहे...
भयाण अस्तित्वहीन पोकळींत
जनावरांचे संतापत मरत जाणारे विकार

बिनतारी यंत्र...विलक्षण भूक...पावाचे तुकडे...
खून...कत्तली...आकाशांत फडकणारें निशाण... निशाणांचें जंगल...

अगणित गर्द तांबडीं फुलं माझ्या अंगावर कां चालून येत आहेत ?
शरीरांत कुणी वेड लागल्यागत तारा छेडीत बसलंय...
कोमलभीषण झणत्कार अव्याहत वहात चाललाय तीव्र होत
शरीराबाहेर...
आवरतांही येत नाहीय तो मला...

माझी शुद्ध आता हरपत चालली आहे...

## घुबडतोंडं मरण आलंय सजून

घुबडतोंडं मरण आलंय सजून राजवस्त्रांत
उभं आहे अंगणांत
भिजलेल्या वृक्षाप्रमाणे

दशदिशांतून ऐकू येणारी ही टपटप कुठल्या सुगंधाची ?

मध्यरात्रीं हांक येत्येय
पांढरीशुभ्र, दयामयी,

तेवत्या मेणबत्तीसारखी स्निग्ध
आणि सारं नगर नाकडोळ्यांनी
पाहूं लागलंय एकाच काळ्या केंद्राकडे चहूबाजूंनी

घड्याळ टिकटिकतंय
क्षणभरांतच तें थांबेल टिकटिकायचं
आणि काळ्या केंद्रांतून एक शुभ्रसतेज पक्षी
कवितेसारखा उडेल अंधारांत...

## तो येतोय, तो येणारच

सगळं गांव सजून त्याची वाट पहात होतं संध्याकाळीं चौकांत
पण तो आलाच नाहीं

तो कसा दिसतो, बोलतो : कुणालाच ठाऊक नव्हतं
तो त्यांच्यासाठी आयुष्य जाळीत आहे एवढंच ते जाणत होते
वाऱ्यावरून येणारे त्याचे आदेश झेलत होते.

तो मुलगा अजून झोपलेला नाही. खिडकीशी डोळे तेवत
पहातोय वाट त्याच्या येण्याची...
हृदयाशी गर्दी करूं लागलेत कितीतरी चेहेरे
मारल्या गेलेल्या आईवडिलांचे, नातेवाइकांचे, घराघरांतून तडफणाऱ्या
कितीक जखमी गांवकऱ्यांचे...
त्याचे डोळे भरून आले. परंतु क्षणांतच त्याने ओठांवर दात गच्च रोवले

नजर आंत वळली. अंधाराचे चौकीपहारे ओलांडून
दूरांत घुसली

कुणीतरी म्हटलेलं त्याला आठवलं :
कुठल्यातरी अज्ञात घरांत तो असतो—
खिडकीशीं विचार करत,
अंधारांत नजर रोवून अपरात्रीं...

त्याला वाटलं,
तो येतोय, तो येणारच—
कुणालाही समजूं शकणार नाही इतक्या दूरवरच्या काळोखांतून
जमिनीखालीं गाडल्या गेलेल्या माणसांतून...
थकून झोपी गेलेल्या जखमांच्या डागांसारख्या माणसांतून...
अंधाराच्या या प्रचंड गांवांत
माणसांसाठी नवी सकाळ घेऊन !

## एका अज्ञात शहराच्या अंतिम धूम्रज्वाला

एका अज्ञात शहराच्या अंतिम धूम्रज्वाला माझ्या मनांत
मीं हवन केलंय या शहराचं स्वतःत

दुसरं शहर आतां थोडयाच वेळांत उजाडेल
एक वैभवशाली शहर : ज्याच्या भगव्या आकाशरेषा
कोरतील दिगंत

तोंपर्यंत एखाद्या बाईच्या कुशींत ही कभिन्न रात्र घालवावी
हें उत्तम !
म्हणजे मृतात्म्यास सद्गती मिळेल
आणि माझ्यांतील मृत्यूचें सांवट मोकळें होऊन
आयुष्याच्या नव्या पहांटेचा जन्म होईल...

## आज कित्येक कल्पांनंतर

आज कित्येक कल्पांनंतर उघडतंय भूपृष्ठ
कोसळतायत माझ्यांतील सनातन बंद महाल
फुटतायत कांचा रंगीबेरंगी आणि भूमीच्या अक्राळविक्राळ जबड्यांत
नाहींशी होताहेत माझ्या बंदपणाचीं प्रतीकचित्रं

नीज फुटावी अचानक आणि फणा उभारून यावा
स्वतःच्या अस्तित्वाचा सर्प
तसा भ्यालोंय मी आणि तरी एखादी अव्यक्त प्रेरणा
सावरून धरतेय मला. हीं कोमेजलेलीं माणसं पसरलेलीं सभोवार
भांडणारीं, भोगणारीं, निराशणारीं आणि पुन्हा पुन्हा
गाळांत रुतत चाललेलीं
मी पहातोंय सभोवार एक नवें नातें जडत चाललेलें माझें
माझ्याच एका अपरिचित रूपाशी

मी मार खात आलोंय शतकानुशतक तरी मी कधी
दुभंगलों नाही संतापानं
मीं उगारल्या नाहींत कधी मुठी स्वतःशीच केलेल्या द्रोहावर

मी सहन करीत आलों शतकानुशतकं आणि फक्त
भिऊन गेलों
मी फक्त गोळा करीत राहिलों माझीं विस्कळीत होत जाणारीं हाडं
आणि करीत राहिलों प्रयत्न मनाला पटविण्याचा
माझ्या व्यक्तित्वाची एकसंधता

तो होता फक्त एक तुरुंग
ज्याला मानलं मी माझा ऐनेमहाल
ज्याच्या रंगीत कांचेमधून मीं पहात राहिलों एक बैरागी
परिक्रमा करणारा
ही परिक्रमा—हें जीवनाकडे पाठ वळवून जाणं—
आणि त्याच वेळीं एका रोमँटिक कल्पनेंत बुडवून टाकणं स्वतःला
की मी आहें सनातन अलिप्ततेचं प्रतीक
—सनातन परंपरेचं प्रतीकं—
तुरुंगांतल्या कैद्याचं जीवन मीं अनुभवलं निरंतर

आणि आज उद्रेक होत चाललाय, उघडतंय भूपृष्ठ जागोजाग
मी पहातोंय एक सुरचित व्यवस्था कोसळतांना
मी अनुभवूं लागलोंय उकळणाऱ्या लाव्हा हजारो जीवांतून
जे अनुभवतायत जिवंतपणींचं मरण नियतीनं लादलेलं त्यांच्यावर
जे करूं लागलेयत सतत प्रयत्न तुरुंगांतून बाहेर पडण्याचा
तुरुंग फोडण्याचा
मला जाणवतंय की हीं दोन्ही रूपं माझींच—
पिळणारं आणि पिळलं जाणारं.
आणि त्याच वेळीं मला वाटतंय की मी स्पष्टीकरण देऊं लागलोंय का?
मी जर एक असतों तर दुसरा नसतों आणि
दुसरा असतों तर पहिला नसतों.
हें माझं अवस्थान्तर देणार आहे का मला चिरस्थायी शांती ?

मला दिसूं लागलंय एक विराट चक्र उत्पत्ति-स्थिति-लय ह्यांचं
आणि दिसू लागलोंय मीच मला पुन्हा परिक्रमा करतांना.

पण ह्या जाणिवेच्या क्षणावर नाही कोणतीही रंगीत कांच
मी नाही अलिप्ततेचं प्रतीक
मला सुटायचंय फक्त माझ्याच अंतःकरणांतल्या तुरुंगांतून
ज्यांत होतात माझींच दोन प्रतीकं तयार
सतत उसळणारीं कोसळणारीं एकमेकांवर
मला फक्त व्हायचंय अत्यंत निर्मोही
पुन्हां जगांत परतण्यासाठी माझे अत्यंत शांत तरीही
दृढ डोळे घेऊन.

२२३५९
का. क्र. काव्य
२३५२
REFBK-0022359
REFBK-0022359